**8th June 2026**

GMRICS along with GMDC conducted placement drive at the Department of Geology, Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University on June 8, 2026, for recruitment of Geologists, organized with the university's Placement Cell. CEO GMRICS along with GMDC officials highlighted career prospects in mineral exploration and encouraged the students. The selection process included a written exam followed by interviews. A total of 41 students took preliminary test and 4 candidates are selected.





दैनिक लोकवाहिनी

Lokvahini | 2026-06-09 | Page- 12
epaper.lokvahini.com

# भूगर्भशास्त्र विभागात जीएमआरआयसीएसचा 'प्लेसमेंट ड्राईव्ह'

## जिओलॉजिस्ट म्हणून विद्यार्थ्यांची होणार नियुक्ती

**लोकवाहिनी न्यूज**

**नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युतर भूगर्भशास्त्र विभागात गुजरात मिनरल रिसर्च अँड इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कन्सल्टन्सी सोसायटीचा (जीएमआरआयसीएस) प्लेसमेंट ड्राईव्ह पार पडला. विद्यापीठाचा रोजगार व प्रशिक्षण विभाग, भूगर्भशास्त्र विभाग आणि जीएमआरआयसीएस यांच्या संयुक्त विद्यमाने या प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले.

भूगर्भशास्त्र विभागाच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विभाग प्रमुख डॉ. सुमेध हुमणे यांनी भूषविले. यावेळी जीएमआरआयसीएसचे सीईओ डॉ. डी. के. सिन्हा, जीएमडीसीचे वरिष्ठ महाव्यवस्थापक (तांत्रिक-१) ए. के. मकाडिया, जीएमडी-एचआरडी व्यवस्थापकीय संचालक तथा जीएमआरआयसीएसचे संचालक (प्रशासन) डॉ. एस. डी. डव, रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन, डॉ. समया हुमणे यांची उपस्थिती होती. प्लेसमेंट ड्राईव्हच्या प्राथमिक परीक्षेकरिता ४१ विद्यार्थी उपस्थित होते.

जीएमआरआयसीएसचे सीईओ डॉ. डी. के. सिन्हा यांनी मनोगत व्यक्त करताना गुजरात सरकारच्या खनिज उत्खननात कार्य करणाऱ्या कंपनीबाबत माहिती दिली. भूगर्भशास्त्र विषयातील विद्यार्थ्यांना या क्षेत्रात उपलब्ध असलेल्या रोजगार संधी तसेच करिअरबाबत विस्तृत माहिती त्यांनी दिली. या कंपनीत कार्य करताना दुर्मिळ मृदा खनिजे उत्खननाचे नाविन्यपूर्ण तंत्र शिकावयास मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

विभाग प्रमुख डॉ. सुमेध हुमणे यांनी प्लेसमेंट ड्राईव्ह करिता आलेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. त्याचप्रमाणे विभागात शिकविल्या जात असलेल्या अभ्यासक्रमांची माहिती त्यांनी यावेळी दिली. रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन यांनी विद्यार्थ्यांना अशा प्रकारच्या रोजगार संधी सातत्याने विभाग उपलब्ध करून देत राहील, असे सांगितले. मुलाखतीसाठी विद्यार्थ्यांना त्यांनी शुभेच्छा दिल्या. विभागात प्रथम विद्यार्थ्यांची प्राथमिक चाचणी परीक्षा घेण्यात आली. ■

Powered by Bharati Web